# स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील शाळा

क्रमांक:माध्य/अ-२/ ४९७३/२०१६
कार्यालय, शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर
दिनांक :- 04 JUL 2016

प्रति,
**संस्थासचिव/अध्यक्ष,**
**ईश क्रिपा सोसायटी ऑफ द पुअर**
**सर्व्हन्ट ईश क्रिपा सदन, सेमिनरी हिल्स**
**पो. नागपूर**

विषय :- सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६ व २४) २०१२
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक एसएफएस - १०१६/ प्र.क्र.६९/एसएम-२ दिनांक १७ जून, २०१६

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये **नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता** प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक ०२ च्या शासन निर्णयानुसार **नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरीता** खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मंडळ संलग्न | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **नागपूर** | **ईश क्रिपा सोसायटी ऑफ द पुअर सर्व्हन्ट ईश क्रिपा सदन, सेमिनरी हिल्स पो. नागपूर** | **डिवाईन प्रॉव्हीडन्स स्कूल, बँक ऑफ इंडियाच्या पाठीमागे फेटरी, काटोल रोड, नागपूर** | **इंग्रजी** | **नवीन शाळा** | **प्राथमिक ते माध्यमिक इ. १ ते १०** | **सीबीएसई** | **२०१६-१७** |

## अटी व शर्ती

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवागी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) या अधिनीयमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून असेल.

४) शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे. त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५) परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग** असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यांत येणाऱ्या पत्रव्यवहारावर स्वयंअर्थसहाय्यीत शाळा/वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळाना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.०३ परिशिष्ठ ०२ मधील विहीत नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

१०) महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयं अर्थसहाय्यीत शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधाकारक राहील.

**शिक्षण उपसंचालक**
**नागपूर विभाग, नागपूर**

प्रतिलिपी :-

१) मा. उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

२) मा. शिक्षण संचालक, प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

४) प्राचार्य/मुख्याध्यापक, **डिवाईन प्रॉव्हीडन्स स्कूल, बँक ऑफ इंडियाच्या पाठीमागे फेटरी, काटोल रोड, नागपूर**